॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या हिवाळी परीक्षांचे बहुतांश निकाल ३० दिवसाच्या आत जाहीर होवू लागले आहेत. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी मूल्यांकनासाठी प्राध्यापकांना पत्र लिहून केलेल्या आवाहनाला सर्व प्राध्यापकांनी उत्तम प्रतिसाद देत मूल्यांकनात चांगला सहभाग घेतल्याचे यावेळी दिसुन येत आहे.

महाराष्ट्रात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे निकालाच्या बाबतीत कायम अग्रेसर राहिलेले आहे. दरवर्षी ३० ते ४५ दिवसात निकाल लागत असतात. आता विद्यापीठात प्राध्यापकांना उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनासाठी येण्याची गरज उरलेली नाही. विद्यापीठाने यावर्षी ऑनलाईन मूल्यांकनासाठी ७५ केंद्र स्थापन केले. वेळेच्या आत निकाल लागावेत यासाठी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी प्राध्यापकांना पत्र लिहून मूल्यांकनात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी देखील तीनही जिल्ह्यात परीक्षेच्या बाबतीत कार्यशाळा घेतल्या. विद्यापीठाचे प्राधिकरण सदस्य व विद्यार्थी संघटनांसोबत विद्यापीठाने बैठका घेऊन कॉपीमुक्त परीक्षेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे यावर्षी कॉपीच्या प्रमाणात घट झालेली दिसुन येत आहे. एप्रिल/मे २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेत ८६५ कॉपी केसेस झाल्या होत्या. आजघडीला ४२६ कॉपी केसेस झाल्या आहेत.

विद्यापीठाने परीक्षांच्या मूल्यांकन कामात उत्तम कामगिरी करणा-या समन्वयक तसेच केंद्र प्रमुख यांना प्रशस्तीप्रमाणपत्र देण्यास प्रांरभ केला आहे. विद्यापीठाच्या प्रयत्नांना शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांनी उत्तम सहकार्य केल्यामुळे निकाल वेळेवर लागत आहेत. प्राध्यापकांनी मूल्यांकनाच्या कामात यावेळी चांगला प्रतिसाद दिला. परीक्षा विभागातील सर्व अधिकारी-कर्मचा-यांनी देखील निकाल वेळेवर जाहीर व्हावे यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे यावेळी परीक्षा संपल्याच्या अंतिम तारखेपासून ३० दिवसाच्या आत बीए (एमसीजे) एम.ए एमसीजे, बी. कॉम, बीपीई, बी. एस्सी, बीएसडब्ल्यु, डीपीए, एमएमएस सीएम, एमएमएस सीएम (नवीन शैक्षणिक धोरणानुसार), एम.ए. मराठी, एम.ए हिंदी, एम.ए इंग्रजी, एम.एस्सी गणित, एम.एस्सी पर्यावरणशास्त्र, एम.एस्सी उपयोजित भूविज्ञान, एम.एस्सी/एम.ए भुगोल, एम.एस्सी संगणकशास्त्र, एम.एस्सी माहिती तंत्रज्ञान, एमबीए, एम.ए संरक्षणशास्त्र, एम.ए नाट्यशास्त्र, एम.ए संगीत, संगीत पदविका, एम.लिब या सर्व परीक्षांचे निकाल ३० दिवसाच्या आत जाहीर झाले आहेत. अद्याप काही परीक्षा सुरू असून सर्व परीक्षांचे निकाल लवकरच जाहीर होतील.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २७ डिसेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी